जि.प.अमरावती

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील तरतूदीतून मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेंतर्गत विकासकामांना मंजूरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व पंचायत राज विभाग**
**शासन निर्णय क्र. विकास-२०२४/प्र.क्र.१६८/भाग-५/योजना-६**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**
**दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२४.**

संदर्भ: १) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र. झेडपीए-२०१५/प्र.क्र-१०/वित्त-९, दि. २५/०३/२०१५.
२) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.विकास- २०१५/प्र.क्र.५२/यो-६,दि.२७/०३/२०१५.
३) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.विकास- २०१५/प्र.क्र.२७४/यो-६,दि.१६/१२/२०१५
४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६, दि.२२/१०/२०१८.
५) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६, दि.०१/०२/२०१९.
६) ग्रामविकास विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.०८/०३/२०१९.
७) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.विकास-२०१९/प्र.क्र.४४/योजना-६, दि.२५/०७/२०१९.
८) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: विकास-२०२०/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.१७/०२/२०२०.

शासन निर्णय :-

राज्यातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींकडून प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होत असतात. त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसंदर्भात संदर्भाधिन क्र. २ ते ८ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

२. मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी अमरावती जिल्ह्यातील विकासकामांसाठी सोबत जोडलेल्या अनुसूचीप्रमाणे एकूण रु. ६००.०० लक्ष (अक्षरी रू. सहाशे लक्ष फक्त) इतक्या रक्कमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. राज्यातील जिल्हा परिषदांना निधी वितरणासाठी LPRS (Liability Payment Register System) प्रणाली राबविण्याबाबत दि. ३१.१२.२०२० च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने सदर मंजूर कामांचा निधी LPRS प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

४. तसेच ज्या कामासाठी अनुदान मंजुर झाले आहे, त्याच कामावर खर्च करणे बंधनकारक राहील. सदर मंजूर कामांच्या यादीमधून संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ ते ८ अन्वये विहीत केलेल्या कामांनाच मंजूरी देण्यात यावी. तसेच,योजनाबाह्य कामे व जी कामे जागेचा अभाव किंवा इतर योजनेंतर्गत या आधी मंजूर असतील किंवा जी कामे ग्रामपंचायत/ग्रामीण भागात येत नसल्यास किंवा इतर काही कारणांमुळे सुरु करणे शक्य नसतील, अशा कामांची शहानिशा करुन त्या कामांची यादी/अहवाल एक महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या सर्व कामांसाठी जिल्हा परिषदेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार अंदाज पत्रके तयार करणे,तांत्रिक मंजूरी, निविदा काढणे/स्वीकारणे, कार्यारंभ आदेश देणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून करुन घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. तसेच सदरील कामे मंजूर अनुदानाच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्चाच्या कामांना मान्यता दिल्यास, त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. तसेच विहित कालावधीतच संबंधित कामे पूर्णत्वास आणावीत. मंजूर कामांना कार्यारंभ आदेश हा शासन निर्णयाच्या मुदतीच्या कालमर्यादेतच द्यावा. या कालावधीनंतर कार्यारंभ आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याचीही नोंद घ्यावी.

६. सदरील कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित क्षेत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका / पोट निवडणूकांसाठी आचारसंहिता अंमलात नाही याबाबत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी खात्री करावी. तसेच कामे दर्जेदार व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत विहित समिती/ संबंधितांकडून खात्री करून घेण्यात यावी. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. याबाबत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी विशेष दक्षता घ्यावी, अन्यथा कसूरदारांवर शासनस्तरावरून कारवाई करण्यात येईल.

७. सदर शासन निर्णय सोबतच्या यादीतील मंजूर केलेली कामे मागील ५ वर्षात ( २५१५ १२३८ ) लेखाशीर्षाखाली किंवा अन्य योजनेतून करून घेण्यात आली नाहीत, याची संबंधित यंत्रणेने खात्री करावी. जर कोणत्याही योजनेतून ५ वर्षापूर्वी अशी कामे करून घेतली असल्यास, अशा प्रसंगी ते काम सुस्थितीत आहे किंवा कसे याबाबत संबंधित यंत्रणेने खात्री करूनच ती हाती घेण्यात यावी. तसचे अशी कामे अन्य योजनेतून मंजूर असून ती सुस्थितीत आढळल्यास अशा कामांच्या बाबतीत तपशीलासह शासनास अवगत करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

८. या मंजूर कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२, दि. १४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार दोषनिवारण दायित्व कालावधी राहील व त्या कालावधीचा निविदेमध्ये समावेश करण्यात यावा.

९. सन २०२४-२५ मधील तरतूदीतून या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या कामांची मुदत दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत राहील. त्यामुळे सदर कामे मुदतीत पूर्ण करावीत. अन्यथा अशा कामांना निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही. वरील बाबींवर होणारा खर्च मागणी क्र. एल-३ मुख्य लेखाशिर्ष-२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम-८००-इतर खर्च (०१) (०८) ग्रामीण भागातील विकास कामासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान (योजनांतर्गत) दत्तमत (२५१५-१२३८), २७ लहान बांधकामे (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या चालू वित्तीय वर्षातील तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१०. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दि.०१ एप्रिल, २०२४ व क्रमांक : अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि. २५ जुलै, २०२४ मधील अटी व शर्तींचे पालन करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

०६।०८।२०२४

(अभिजीत तेलवेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई -३२.
२) मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
४) मा.मंत्री, ग्रा.वि.यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता,१/२ , महाराष्ट्र, मुंबई.
६) महालेखापाल, लेखा व परिक्षा, १/२, महाराष्ट्र, मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
८) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
९) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
११) स्वीय सहायक, अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) स्वीय सहायक, अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) स्वीय सहायक, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-०१.
१४) निवडनस्ती, कार्यासन योजना-६.

Scanned with OKEN Scanner

ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.विकास-२०२४/प्र.क्र.१६८/भाग-५/यो-६,दि. ०६ ऑगष्ट, २०२४ च्या आदेशासोबतची अनुसूची-२५१५ १२३८ अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील (जि.प.) विकास कामांची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | मौजे जुना धामणगाव ता. धामणगाव रेल्वे येथे परसोडी रोड शब्बरसिंग ठाकूर लेआऊट मधील खुल्या जागेत माजी सैनिक सभागृह बांधकाम करणे. | १५.०० |
| २ | मौजे बोरगाव धांदे ता. धामणगाव रेल्वे येथे ग्रामपंचायत च्या मोकळ्या जागेवर अण्णाभाऊ साठे सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| ३ | मौजे आसेगाव ता. धामणगाव रेल्वे येथे राहुल सरोसरे ते शालिक झामरे यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे. | ७.०० |
| ४ | मौजे गौरखेडा ता. नांदगाव खंडेश्वर येथे भोई समाज येथे सामाजिक सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| ५ | मौजे मांजर खेड कसबा (तांडा) ता. चांदूर रेल्वे येथे मांजरखेड कसबा (तांडा) येथे ग्रामपंचायतच्या मोकळ्या जागेवर सभागृह बांधणे. | १०.०० |
| ६ | मौजे चिरोडी ता. चांदूर रेल्वे येथे चाफालाल महाराज समोर सभागृह बांधकाम करणे. | १३.०० |
| ७ | मौजे धानोरा शिक्रा ता. नांदगाव खंडेश्वर येथे महादेव मंदिरा समोरील ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर सभागृह बांधणे. | १०.०० |
| ८ | मौजे पाथरगाव ता. चांदूर रेल्वे येथे स्मशानभूमी बांधकाम करणे. | ५.०० |
| ९ | मौजे कोठोडा ता. नांदगाव खंडेश्वर येथे सोपीनाथ महाराज मंदिर समोर ग्रा.पं. च्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| १० | मौजे अडगाव बु ता. नांदगाव खंडे येथे स्मशानभूमी शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| ११ | मौजे देऊळगव्हाण ता. नांदगाव खंडेश्वर येथे बौद्ध विहारा समोर ग्रा.पं.च्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | ७.०० |
| १२ | मौजे वकनाथ ता. धामणगाव रेल्वे येथे हनुमान मंदिराजवळ ग्रा.पं.च्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १२.०० |
| १३ | मौजे सोनेगाव खर्डा ता. धामणगाव रेल्वे येथे ग्रा.प. अंतर्गत खर्डा येथे ग्रा.पं.च्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १२.०० |
| १४ | मौजे पिंपळगाव बैनाई ता. नांदगाव खंडेश्वर येथे महादेव मंदिराजवळ ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| १५ | मौजे बेलोरा (धामक) ता. नांदगाव खंडे येथे बेलोरा (धामक) येथे ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर स्मशान शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| १६ | मौजे तळेगाव द ता. धामणगाव रेल्वे येथे तातेश्वर मंदिरा समोर ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | २०.०० |
| १७ | मौजे सालोड ता. नांदगाव खंडे येथे गोवारी समाजाकरिता ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १३.०० |
| १८ | मौजे मंगरूळ चव्हाळा ता. नांदगाव खंडे येथे वार्ड नं २ भोई समाजाकरिता ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १३.०० |
| १९ | मौजे शेलू नटवा ता. नांदगाव खंडे येथे भोई समाजाकरिता ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १२.०० |
| २० | मौजे निमला ता. चांदूर रेल्वे येथे ग्रा.पं. टेंभूर्णी अंतर्गत निमला येथे हनुमान मंदिर समोर ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |

ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.विकास-२०२४/प्र.क्र.१६८/भाग-५/यो-६,दि. ०६ ऑगष्ट, २०२४ च्या आदेशासोबतची अनुसूची-२५१५ १२३८ अंतर्गत अमरावती जिल्हयातील (जि.प.) विकास कामांची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| २१ | मौजे अमदोरी ता. चांदूर रेल्वे येथे हनुमान मंदिर समोर ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| २२ | मौजे धानोरा मोगल ता. चांदूर रेल्वे येथे वार्ड नं ३ मध्ये हनुमान मंदिर समोर ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १४.०० |
| २३ | मौजे जावरा ता. चांदूर रेल्वे येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समोर ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १४.०० |
| २४ | मौजे ढवळसरी ता. नांदगाव खंडेश्वर येथे प्रमोद इंगळे ते जानराव वानखडे घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | ६.०० |
| २५ | मौजे मांजरी म्हसला ता. नांदगाव खंडेश्वर येथे म्हसला येथे महादेव मंदिराजवळील ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १५.०० |
| २६ | मौजे मंगरूळ दस्तगीर ता. धामणगाव रेल्वे येथे ग्रा.पं. अंतर्गत वार्ड क्रमांक ४ मध्ये ग्रामपंचायतच्या मोकळ्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | २०.०० |
| २७ | मौजे बग्गी (अश्रफपूर) ता. चांदूर रेल्वे येथे अश्रफपूर येथे वाल्मिक चौकटे ते सुरेंद्र जाधव यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | ७.०० |
| २८ | मौजे जळगाव आर्वी ता. धामणगाव रेल्वे येथे बिसन सहारे ते परीक्षित बाबा मंदिराकडे जाणारा पोच रस्ता करणे. | २०.०० |
| २९ | मौजे विटाळा ता. धामणगाव रेल्वे येथे ग्रामपंचायत अंतर्गत विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १५.०० |
| ३० | मौजे जनुना ता. नांदगाव खंडे येथे भोई समाजाकरिता ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १२.०० |
| ३१ | मौजे कळमगाव ता. चांदूर रेल्वे येथे नाग मंदिर जवळ ग्रामपंचायतच्या खुल्या जागेवर सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| ३२ | मौजे जुना धामणगाव ता. धामणगाव रेल्वे येथे मुख्य रस्त्यापासून खाटू श्याम बाबा मंदिराकडे जाणारा डांबररस्ता बांधकाम करणे. | २०.०० |
| ३३ | मौजे पापळ ता. नांदगाव खंडे येथे महादेव मंदिरासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सौंदर्यीकरण करणे. | १०.०० |
| ३४ | मौजे तळेगाव द ता. धामणगाव रेल्वे येथे तळेगाव ते फाळेगाव रस्त्याचे डांबरीकरण करणे व पुलाचे बांधकाम करणे. | ४०.०० |
| ३५ | मौजे कारला ता. चांदूर रेल्वे येथे कारला येथे ग्रा.प च्या खुल्या जागेत सामाजिक सभागृह बांधकाम करणे. | १५.०० |
| ३६ | मौजे जुना धामणगाव ता. धामणगाव रेल्वे येथे न्यू पांडे नगर मध्ये वऱ्हाडे ते बावणे ते मोरे ते गुडे घरापर्यंत डांबर रस्ता व नाली करणे. | १५.०० |
| ३७ | मौजे जावरा ता. चांदूर रेल्वे येथे प्रवासी निवारा बांधकाम करणे. | ५.०० |
| ३८ | मौजे जुना धामणगाव ता. धामणगाव रेल्वे येथे धामणगाव रेल्वे ते जुना धामणगाव रस्त्यावरील काकाजी रेस्टोरंट समोरील हनुमान टाऊन कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. | १५.०० |
| ३९ | मौजे मंगरूळ द ता. धामणगाव रल्वे येथे झोले ते सुधाकर बमनोटे ते प्रकाश देवगडे घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे. | ६.०० |

०६।०८।२०२४

ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.विकास-२०२४/प्र.क्र.१६८/भाग-५/यो-६,दि. ०६ ऑगष्ट, २०२४ च्या आदेशासोबतची
अनुसूची-२५१५ १२३८ अंतर्गत अमरावती जिल्हयातील (जि.प.) विकास कामांची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| ४० | मौजे वाढोणा ता. धामणगाव रेल्वे येथे अवधूत महाराज सभागृहाजवळ सामाजिक सभागृह बांधकाम करणे. | १०.०० |
| ४१ | मौजे वाढोणा ता. धामणगाव रेल्वे येथे स्मशान भूमी शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| ४२ | मौजे दिघी महल्ले ता. धामणगाव रेल्वे येथे स्मशान भूमी शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| ४३ | मौजे जुना धामणगाव ता. धामणगाव रेल्वे येथे जुना धामणगाव येथे खेतान नगर मध्ये टाले ते शाहू यांच्या घरा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | १४.०० |
| ४४ | मौजे एकपाळा ता. चांदूर रेल्वे येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समोरील ग्रा.पं. च्या खुल्या जागेत सभागृह बांधकाम करणे. | १४.०० |
| ४५ | मौजे मांजर खेड कसबा तांडा ता. चांदूर रेल्वे येथे मांजरखेड कसबा (तांडा) येथे स्मशान शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| ४६ | मौजे जळगाव मंगरूळ ता. धामणगाव रेल्वे येथे रंगरावजी फटे ते बौद्ध विहारा पर्यंत सिमेंट रस्ता करणे. | १४.०० |
| ४७ | मौजे मंगरूळ द ता. धामणगाव रेल्वे येथे रमेश सुने ते सुधाकर कावडे घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | ४.०० |
| ४८ | मौजे लोणी ता. नांदगाव खंडेश्वर येथे लोणी नांदगाव खंडेश्वर गौमाता मंदिर येथे ग्रा.पं.च्या खुल्या जागेवर तार कुंपण व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५.०० |
| ४९ | मौजे अडगाव बु. ता. नांदगाव खंडेश्वर येथे प्रकाश मदनकर ते दादारावजी खोब्रागडे यांच्या घरा पर्यंत रस्ता बांधकाम करणे. | ६.०० |
| ५० | मौजे चोर माउली ता. नांदगाव खंडेश्वर येथे स्मशानभूमी शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| ५१ | मौजे शिरपूर ता. नांदगाव खंडेश्वर येथे स्मशानभूमी शेड बांधकाम करणे. | ५.०० |
| ५२ | मौजे लालखेड ता. चांदूर रेल्वे येथे स्मशानभूमी बांधकाम करणे. | ४.०० |
| ५३ | मौजे चांदूरखेडा ता. चांदूर रेल्वे येथे बस शेड बांधकाम करणे. | ४.०० |
| ५४ | मौजे घुईखेड ता. चांदूर रेल्वे येथे वार्ड क्र. मध्ये चांदूर रेल्वे रस्त्यावर येथे प्रवासी निवारा बांधकाम करणे. | ५.०० |
| ५५ | मौजे पळसमंडळ ता. नांदगाव खंडेश्वर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुतळा परिसरामध्ये ग्रामपंचायतच्या जागेवर सौंदर्यीकरण करणे. | ५.०० |
| ५६ | मौजे वेणी गणेश पुर ता. नांदगाव खंडेश्वर येथे वेणी गणेश पुरते पळस मंडळ रस्त्याला जोडणारा पूल बांधकाम करणे. | १२.०० |
| | एकूण रक्कम | ६००.०० |

०६/०८/२०२४